# ग्रंथ आमचे साथी...विश्व आमच्या हाती

## दीक्षान्त समारंभाच्या पार्श्वभूमीवर ग्रंथदिंडी उत्साहात; शेकडो विद्यार्थी-विद्यार्थिनींचा सहभाग

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

ग्रंथ आमचे साथी, विश्व आमच्या हाती... ग्रंथ वाचाल तर कुठेही सुखी राहाल... वाचाल तर वाचाल, अशा आशयाचे फलक घेऊन शेकडो विद्यार्थी ग्रंथदिंडीत सहभागी झाले. शुक्रवारी सकाळी कमला कॉलेजपासून ग्रंथदिंडीला सुरुवात झाली. विविध महाविद्यालयांचे विद्यार्थी, विद्यार्थिनी, एन. सी. सी., राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक सहभागी झाले होते. शिवाजी विद्यापीठाच्या आवारात पथनाट्यांनी दिंडीची सांगता करण्यात आली.

कमला कॉलेज येथे शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे व ताराराणी विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष डॉ. क्रांतीकुमार पाटील यांच्या हस्ते ग्रंथ दिंडीचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी प्र. कुलगुरू डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदिवडेकर, डॉ. डी. आर मोरे, महेश काकडे, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. डी. के. गायकवाड, व्ही. टी. पाटील, डॉ. नमिता खोत, अमित कुलकर्णी, डॉ. पी. डी. राऊत, डॉ. आर. जी. कोरबू, डॉ. डी. बी. सुतार यांच्यासह बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्त्रोत केंद्र व माहितीशास्त्र विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

राजारामपुरी पहिली गल्ली, माऊली पुतळा चौक, सायबर चौक, दूरशिक्षण केंद्रमार्गे दिंडी विद्यापीठात आली. दिंडीच्या अग्रभागी फुलांनी सजवलेल्या पालखीमध्ये ग्रंथ ठेवण्यात आले होते. वाचनसंस्कृतीबाबत प्रबोधन करणारे फलकांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी शहरवासीयांचे लक्ष वेधले. जय जवान, जय किसान, जय शिवाजी, जय भवानी अशा घोषणांनी वातावरणात स्फुलिंग संचारले. पुलवामातील शहिदांना यावेळी श्रद्धांजली वाहण्यात आली.





कोल्हापूर : कमला कॉलेज येथे ग्रंथ पूजनाने दिंडीला सुरुवात झाली. फुलांची आरास केलेल्या पालखीतील ग्रंथाचे पूजन करताना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. सोबत डॉ. डी. आर. मोरे, डॉ. नमिता खोत, महेश काकडे, डॉ. ए. एम. गुरव आदी. तर दुसऱ्या छायाचित्रात विद्यापीठ आवारात पथनाट्यांच्या सादरीकरणाने दिंडीचा समारोप करण्यात आला. पथनाट्य सादर करताना कमला कॉलेजच्या विद्यार्थिनी. (छाया : पप्पू अत्तार)




कोल्हापूर : कमला कॉलेज ते शिवाजी विद्यापीठ मार्गावर काढण्यात आलेल्या ग्रंथदिंडीत सहभागी विद्यार्थिनी.

### लक्षवेधी फलक

माणसाची चौथी मूलभूत गरज म्हणजे पुस्तक, ज्ञान म्हणजे आत्मतत्त्वांचा बोध होणे होय, ग्रंथ आमच्या हाती... विश्व आमच्या हाती, वाचन बुद्धीचे खाद्य आहे, पुस्तक म्हणजे मन निर्मळ करणारा साबण अशा आशयाचे फलक लक्षवेधी ठरले.

### पथनाट्यांतून जनजागृती

ग्रंथदिंडीत सहभागी विद्यार्थ्यांनी पथनाट्यांद्वारे जनजागृती केली. कमला कॉलेजने 'स्त्री दास्यातून तुझी सुटका', शहाजी महाविद्यालयाने 'क्षयरोग एक भयान वास्तव' या विषयांवर पथनाट्य सादर केले. तर शाहू कॉलेजचे विद्यार्थी झांजपथक घेऊन सहभागी झाले होते.

### ग्रंथ प्रदर्शनाला प्रतिसाद

परीक्षा भवन समोरील जागेत ग्रंथप्रदर्शनाचे स्टॉल मांडण्यात आले आहेत. दोन दिवस चालणाऱ्या प्रदर्शनात शिवाजी विद्यापीठातील दुर्मीळ ग्रंथ, स्पर्धा परीक्षेची पुस्तके, कायदा, इतिहास, साहित्य क्षेत्रातील ग्रंथांचा समावेश आहे. कौशल्य व उद्योजकता विकास विभागाच्या खाद्य स्टॉलवरही गर्दी होती.